महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

सोमवार ❖ ११ नोव्हेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १३६ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024



# महायुतीचेच सरकार येणार

## - अमित शहांचा दावा

## पवारांना मुलीला, तर ठाकरेंना मुलाला मुख्यमंत्री करायचं !

### - शहांचा घणाघात

सांगली : महाविकास आघाडीची सत्ता येणे अशक्य आहे, तरीही केवळ काँग्रेसमध्येच मुख्यमंत्रिपदासाठी डझनभर नेते गुडघ्याला बाशिंग लावून बसले आहेत. शरद पवार यांना त्यांच्या मुलीला, तर उद्धव ठाकरे यांना मुलाला मुख्यमंत्री करायचे आहे, अशी टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी शिराळा येथे प्रचार सभेत बोलताना केली. शिराळा येथे भाजप उमेदवार सत्यजित देशमुख यांच्या प्रचारार्थ आज गृहमंत्री शहा यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर शिराळ्याचे उमेदवार देशमुख, वाळव्याचे महायुतीचे उमेदवार निशिकांत पाटील, खा. धैर्यशील माने, भाजपचे पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे आदी उपस्थित होते.

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक होण्यासाठी अवघ्या दहा दिवसांचा कालवाधी उरला आहे. २० नोव्हेंबरला राज्यात मतदान पार पडणार आहे तर २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीनंतर सरकार कुणाचं येणार? याबाबत विविध अंदाज वर्तवले जात आहेत. महायुतीने पुन्हा आम्हीच येऊ असं म्हटलं आहे. तर महाविकास आघाडीने आमच्या १८० हून जास्त जागा येतील असा दावा केला आहे. प्रचाराची रणधुमाळी सुरु झाली आहे. दरम्यान महाराष्ट्रात भाजपाने जाहीरनामा जाहीर केला आहे. महाविकास आघाडी किंवा महायुती कुणीही मुख्यमंत्री जाहीर केलेला नाही. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात आम्ही निवडणूक लढवू असं म्हटलं आहे. अमित शाह यांनी मुख्यमंत्री कोण होईल? या प्रश्नावर उत्तर दिलं.

महाराष्ट्राची निवडणूक म्हणावी तितकी सोपी नाही. कारण यावेळी शिवसेनेची दोन शकलं झाली आहेत आणि राष्ट्रवादी काँग्रेसची दोन शकलं झाली आहेत. त्यामुळे यंदा सहा पक्षांची लढाई एकमेकांच्या विरोधात रंगणार आहे. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक यंदा सोपी नाही. कारण महायुती विरुद्ध महाविकास आघाडी थेट सामना आहे. दरम्यान भाजपाने जेव्हा जाहीरनामा जाहीर केला त्यानंतर महायुतीची सत्ता आल्यास मुख्यमंत्री कोण? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी त्याचं उत्तर अमित शाह यांनी दिलं आहे. महायुतीचे सरकार आल्यानंतर आता धर्मांतरविरोधात कठोर कायदा पान ४ वर ▶▶

### भाजप संकल्पपत्राचे प्रकाशन

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे संकल्पपत्राचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते रविवारी प्रकाशन झाले. त्यावेळी अमित शाह यांनी उद्धव ठाकरे यांनी थेट आव्हान दिले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासंदर्भात राहुल गांधी केवळ दोन शब्द चांगले बोलू शकतील का? बाळासाहेब ठाकरे यांच्यासंदर्भात काँग्रेसचा कोणताही नेता दोन चांगले शब्द बोलेल का? असे आव्हान अमित शाह यांनी दिले. उद्धवजी तुम्ही कोणासोबत बसला आहात, जी लोक कलम ३७० ला विरोध करत आहे, जी लोक राम मंदिरास विरोध करतात, जी लोक सावकरसंदर्भात चांगले बोलू शकत नाही? संभाजीनगर नावाला विरोध करणाऱ्यांसोबत तुम्ही बसला आहात. सीएएस, युसीसीला विरोध करणाऱ्यांसोबत बसला आहोत. वक्फ बिलच्या सुधारणेला विरोध करणाऱ्यांसोबत बसला आहात. तुम्हाला कुठे बसायचं हे तुम्हीच ठरवा, असे अमित शाह यांनी उद्धव ठाकरे यांना म्हटले.




# मी म्हातारा झालो नाही !

### - शरद पवारांचा विरोधकांना इशारा



**सरकार बदलल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही !**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

महाविकास आघाडीकडून खासदार शरद पवार हे विधानसभा निवडणुकीला अवघे काही दिवस शिल्लक असताना राज्यभरात दौरे करून महाराष्ट्र पिंजून काढत आहेत. शरद पवारांनी आज धाराशिवमध्ये जाहीर सभा घेतील यावेळी त्यांनी महायुतीवर निशाणा साधा इतकंच नाहीतर राज्यातील सत्ता बदलणारच असा निर्धारही शरद पवारांनी व्यक्त केला आहे. सभेत बोलताना शरद पवार म्हणाले, ओमराजे निंबाळकर मला तुमची गोष्ट आजिबात पान ४ वर ▶▶

### महायुती उमेदवार सुलभा गायकवाड यांच्या प्रचारासाठी

# देवेंद्र फडणवीस उद्या कल्याणमध्ये



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ कल्याण**

कल्याण : कल्याण पूर्व विधानसभाच्या मतदार संघाच्या महायुतीच्या अधिकृत उमेदवार सुलभा गणपत गायकवाड यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जाहीर सभेचे आयोजन कल्याणमध्ये करण्यात आले आहे. मंगळवारी दि१२ नोव्हेंबर रोजी कल्याण पूर्वेतील पोटे मैदान येथे संध्याकाळी ६ वा. हि सभा संपन्न होणार आहे.



# प्रचारात आम्ही कुठे ?

## कल्याण, ठाण्यातील रेल्वे प्रवासी संघटनांचा सर्व उमेदवारांना सवाल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** - विधानसभा निवडणुकांचे हंगाम सुरू झाला असून या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू आहे. तसेच जाहिरनामे सादर केले जात आहेत. मतदारांना वळवण्यासाठी विविध धोरणे राबवणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र लाखोंच्या संख्येने रेल्वे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना प्रचाराच्या रणधुमाळीत आम्ही आहोत कुठे ? असा प्रश्न पडला आहे. ठाणे जिल्ह्यात विधानसभेचे १८ मतदारसंघ आहेत. यापैकी बहुसंख्य मतदार संघ हे रेल्वे स्थानकांना खेटून आहेत. मध्य रेल्वेने मध्यंतरी प्रकाशित केलेल्या आकड्यांनुसार एकटया ठाणे रेल्वे स्थानकातून सात लाख प्रवासी प्रवास करतात. ठाण्यापासून डोंबिवली पर्यंत आणि कसारा, कर्जत पर्यंत रेल्वे स्थानकांतून लाखो प्रवाशांचा राबता असतो. लोकसभा निवडणुकीत निवडून येणारे खासदार रेल्वे प्रश्नांशी संबंधित विषय मांडतील अशी अपेक्षा असली तरी विधानसभा निवडणुकीतही रेल्वे स्थानकात आणि आसपासच्या प्रश्नांची दखल घेतली जावी अशी अपेक्षा रेल्वे प्रवासी आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनांनी लोकसत्ताशी बोलताना केली. बदलापूर, कर्जत, वांगणी, अंबरनाथ, कल्याण-डोंबिवली या पान ४ वर ▶▶

### बाबा सिद्दिकींवर गोळ्या झाडणाऱ्या


# शिवकुमारला बहराइचमधून अटक



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळया झाडण्यात आल्या होत्या, या घटनेत ते गंभीर जखमी झाले होते. सिद्दीकी यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेत तीन आरोपींचा समावेश होता. ज्या दिवशी बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता, त्याच दिवशी पोलिसांनी यातील दोन शूटरला अटक केली होती, मात्र ज्याने सिद्दीकी यांच्यावर गोळीबार केला होता, तो मुख्य शूटर शिवकुमार गौतम हा गर्दीचा फायदा घेऊन फरार झाला होता. अखेर त्याला अटक करण्यात आला पोलिसांना यश आलं आहे. आरोपीकडून अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बाबा सिद्दीकी हत्याप्रकरणात पोलिसांना मोठं यश आलं आहे. या प्रकरणातील मुख्य शूटर शिवकुमार गौतमला अटक करण्यात आली आहे. त्याला उत्तर प्रदेशच्या बहाराईच येथून अटक करण्यात आली आहे. शिवकुमार गौतम सोबत आणखी २ इतर आरोपींना देखील पोलिसांनी अटक केलं आहे. मुंबई पोलीस गुन्हे शाखा आणि उत्तर प्रदेश एस टी एफ ने ही संयुक्त कारवाई केली आहे. उत्तर प्रदेश एस टी एफच्या पथकासोबत मुंबई पोलीस गुन्हे शाखेचे सहा अधिकारी आणि इतर पंधरा जण या संयुक्त कारवाईत सहभागी झाले होते. दरम्यान अटक करण्यात आलेल्या आरोपींना आता मुंबईला आणलं जात आहे. पोलीस तपासात आरोपींकडून अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे.

काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीक यांच्यावर गोळीबार करण्यात आला. ज्या दिवशी गोळीबार करण्यात आला तो दसऱ्याचा दिवस होता. सिद्दीकी हे आपल्या मुलाला भेटण्यासाठी कार्यालयात आले होते. याचदरम्यान तिघांनी बाबा सिद्दकी यांच्यावर गोळीबार केला. या घटनेत ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या हत्याप्रकरणी लॉरेन्स बिश्नोई गँगच कनेक्शन देखील समोर आलं आहे.




# महायुतीचे उमेदवार किसन कथोरेंच्या यांच्या प्रचाराचा मुरबाड शहरात धडाका!

गेल्या पंधरा वर्षात मुरबाड शहराचा कायापालट हा केवळ आमदार किसन कथोरेंच्या माध्यमातून झाला आहे हे सांगण्यासाठी कोणत्याही ज्योतिषाची गरज नाही. त्यामुळे मुरबाड शहरातून येणाऱ्या निवडणुकीत शहरातील मतदार ठामपणे कथोरे साहेबांच्या पाठिशी उभा राहिल यात शंका नसून शहरातून मताधिक्य मिळेल

**- मोहन आत्माराम सासे, माजी नगराध्यक्ष नगरपंचायत मुरबाड**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुरबाड-प्रतिनिधी मुरबाड विधानसभा मतदारसंघात भाजपा महायुतीचे उमेदवार किसन कथोरेंनी प्रचारात आघाडी घेतली असून मुरबाड शहरातील एकुण १७ प्रभागांमध्ये भाजपा, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, रिपाई (आ) महायुतीच्या कार्यकर्त्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. यामध्ये आजी माजी नगराध्यक्ष , शहराध्यक्ष, सर्व नगरसेवक, नगरसेविका, महिला कार्यकर्त्या, बूथ प्रमुख, प्रमुख पदाधिकारी यांनी प्रचाराचा धडाका उडवला असून प्रत्येक मतदार पर्यंत पोहचत आहेत. मुरबाड शहरातून १० हजारांचे मताधिक्य देण्याचे लक्ष ठेवले असून त्या दृष्टीने कार्यकर्ते कामाला लागले आहेत.आमदार किसन कथोरे यांनी मुरबाड शहराचा कायापालट केला आहे हे मुरबाडकर जाणून आहेत. महत्वाचे म्हणजे शहरातील अनेक वर्षाची भिषण पाणी टंचाई दुर करुन महिलांच्या डोक्यावरचा हंडा उतरविला आहे. या निवडणुकीतही मुरबाड शहरातील मतदार कथोरेंच्या म्हणजे विकास कामांच्या पाठिशी उभे राहणार आहेत.



# आघाडीच्या मुख्यमंत्रिपदाबाबत शरद पवारांचे मोठं वक्तव्य



दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ विशेष प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका आता अवघ्या ११ दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत, त्यामुळे प्रचाराच्या तोफाही धडाडत आहेत. कालच अमित शाह यांनी देवेंद्र फडणवीस महायुतीचे मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असतील असे संकेत दिले होते. यानंतर आता शरद पवारांनीही महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रिपदाबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. उद्धव ठाकरेंना काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्रिपदाबाबतचा जो फॉर्म्युला मान्य नव्हता, तोच शरद पवारांनी सांगितला आहे. इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीमध्ये शरद पवारांनी मुख्यमंत्रिपदाबाबत मोठं विधान केलं आहे. 'आम्ही सगळे एकत्र बसू, ज्याच्यांकडे आमदारांची संख्या जास्त असेल त्यांना विनंती करू की तुम्ही तुमच्या पक्षाचा निवडा, आमचा पाठिंबा त्याला. ज्यांच्या जास्त जागा असतील त्यांना आमचा पाठिंबा. माझ्या पक्षाचं ते धोरण आहे', असं शरद पवार म्हणाले आहेत.

ठाकरेंना फॉर्म्युला मान्य होणार?

शरद पवारांचा हा फॉर्म्युला उद्धव ठाकरेंना मान्य होणार का? याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. कारण काहीच दिवसांपूर्वी उद्धव ठाकरेंनी ज्यांच्या जास्त जागा त्यांचा मुख्यमंत्री हा फॉर्म्युला मान्य नसल्याचं महाविकास आघाडीच्या व्यासपीठावरून सांगितलं होतं. या फॉर्म्युलामुळे पाडापाडी होते, मित्रपक्षच एकमेकांचे उमेदवार पाडतात असं वक्तव्य उद्धव ठाकरेंनी केलं होतं.

**महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला**

महाविकास आघाडीच्या जागावाटपामध्ये काँग्रेस हा मोठा भाऊ ठरला. काँग्रेस १०१ जागांवर, उद्धव ठाकरेंचा पक्ष ९३ जागांवर तर शरद पवारांची राष्ट्रवादी ८६ जागांवर निवडणूक लढत आहे. तर उरलेल्या जागा महाविकास आघाडीने मित्रपक्षांना सोडल्या आहेत.

## सुलभा गायकवाड यांच्या विजयाचा खासदार श्रीकांत शिंदे यांना विश्वास



### कल्याण पूर्वेत महायुती कार्यकर्ता मेळावा संपन्न

### अफवांना बळी पडू नका - खासदार श्रीकांत शिंदे यांचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी

**कल्याण** : कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या उमेदवार सुलभा गणपत गायकवाड यांच्या प्रचारार्थ महायुती मेळाव्याचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना अफवांना बळी पडू नका असा आदेश दिला. पक्षाचा आदेश हाच अंतिम आदेश असतो. पक्षाचा आदेश आहे महायुतीच्या उमेदवारास प्रचंड बहुमतांनी विजयी करायचे आहे.

कल्याण पूर्व शिवसेना शहर प्रमुख महेश गायकवाड यांनी बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लढत आहेत. या पार्श्वभूमीवर आपल्याला दिलेली जबाबदारी ही तंतोतंत पाळलीच पाहिजे. आवडत असेल किंवा नसेल महायुतीचा धर्म पाळून उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करा. याविषयी कोणालाही शंका येता कामा नये अशी तंबी वजा आदेश कार्यकर्त्यांना देत महायुतीच्या स्थानिक नेत्यांना महायुतीच्या उमेदवार सुलभा गायकवाड यांच्या विजयाचा विश्वास खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिला. या मेळाव्याला भाजपा ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, भाजपा जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शिंदे, भाजपा महिला जिल्हाध्यक्षा रेखा चौधरी, विधानसभा प्रमुख निलेश शिंदे, रमाकांत देवळेकर, प्रशांत काळे, उपजिल्हा प्रमुख अरुण आशान, माजी उपमहापौर मोरेश्वर भोईर, भाजपा कल्याण पूर्व मंडळ अध्यक्ष संजय मोरे, महिला मंडळ अध्यक्षा सविता देशमुख, माजी नगरसेवक अभिमन्यू गायकवाड, राजाराम पावशे, नवीन गवळी, मल्लेश शेट्टी, माजी नगरसेविका हेमलता पावशे, इंदिरा तरे, राजवंती मढवी, माधुरी काळे तसेच महायुतीचे इतर मान्यवर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## डोंबिवली विधानसभा मतदारसंघात स्वच्छता दुत आणि स्विप टीम मार्फत मतदान जनजागृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी

**कल्याण** : १४३ डोंबिवली विधानसभा मतदारसंघात रविवारी कमी मतदान झालेल्या विभागात, परिसरात स्वीपची टीम आणि घनकचरा व्यवस्थापन विभागा तर्फे, स्वच्छता दूतामार्फतही मतदान जनजागृती करण्यात आली.

वृत्तपत्र वाचकांमार्फत घरोघरी हँडबिल वाटप करून मतदान जनजागृती करण्यात येत आहे. तसेच दुकानदार, फळवाले, भाजीवाले यांच्या गृहभेटी घेऊन हँडबिल वाटप करण्यात आले.

वेगवेगळ्या परिसरात गाडी फिरत असताना त्यावर ऑडिओ क्लिप लावून मतदान टक्केवारी वाढण्यासाठी स्वच्छता दूत काम करत आहेत. त्याच प्रमाणे रिक्षा स्टँड येथे रिक्षा मालक, चालकांच्या रिक्षांना स्टिकर लावून डोंबिवली १४३ विधानसभा क्षेत्रात मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली.

## ठाणे जिल्ह्यातील ७२ लाख २९ हजार ३३९ मतदार करणार मतदान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी

**ठाणे, दि.१०** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. तर दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडेल.ठाणे जिल्ह्यात १३४-भिवंडी ग्रामीण (अ.ज.), १३५-शहापूर (अ.ज.), १३६-भिवंडी पश्चिम, १३७-भिवंडी पूर्व, १३८-कल्याण पश्चिम, १३९-मुरबाड, १४०-अंबरनाथ (अ.जा.), १४१-उल्हासनगर, १४२-कल्याण पूर्व, १४३-डोंबिवली, १४४-कल्याण ग्रामीण, १४५-मिरा भाईंदर, १४६-ओवळा माजिवाडा, १४७-कोपरी पाचपाखाडी, १४८-ठाणे, १४९-मुंब्रा कळवा, १५०-ऐरोली, १५१-बेलापूर असे १८ विधानसभा मतदारसंघ आहेत.

**मतदारसंघाचे एकूण मतदार:-**

ठाणे जिल्ह्यात दि.२९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण ७२ लाख २९ हजार ३३९ मतदार आहेत. यामध्ये पुरुष मतदार: ३८ लाख ४५ हजार ४२, महिला मतदार: ३३ लाख ८२ हजार ८८२, इतर/तृतीयपंथी मतदार: १ हजार ४१५ आहेत. तसेच यामध्ये सैनिक मतदार: १ हजार ६०३, एनआरआय मतदार: ९७९, दिव्यांग ३८ हजार १४९, १८-१९ वयोगटातील १ लाख ७२ हजार ९८१ मतदार तर ८५ पेक्षा अधिक वयोगटातील ५६ हजार ९७६ मतदार आहेत.

तरी, पात्र मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मतदान करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## मौलाना अबुल कलाम आझाद जयंती


**११ नोव्हेंबर १८८८**

हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी झटणारे आणि भारतीय शिक्षण व्यवस्थेचा पाया रचणारे भारतीय विचारवंत म्हणून मौलाना आझाद हे प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८८८ रोजी झाला. ते लहानपणापासूनच हुशार होते. त्यांचे शिक्षण इजिप्त मधील कैरो येथील 'अल् अजहर 'या विद्यापीठात झाले. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी अरबी, फारसी व उर्दू भाषेवर प्रभुत्व मिळविले. त्यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन अहमद असे होते. अबुल कलम म्हणजे 'वाचस्पती 'अथवा ' पंडित' या अर्थाचे नाव त्यांना त्यांच्या अलौकिक बुद्धीमुळे प्राप्त झाले.



सुरुवातीला आझाद यांनी कलकत्त्यातील वृत्तपत्रातून आपले विचार प्रगट करावयास सुरुवात केली. १९०५ साली ते लखनऊ येथील 'अल् नदवा' या वृत्तपत्राचे संपादक झाले. १९१२ मध्ये त्यांनी कलकत्ता येथे स्वतःचे 'अल् हिलाल 'नावाचे साप्ताहिक सुरू केले. पुढे मौलाना आझाद यांनी प्रतिगामी विचारांवर टीका केली. हिंदुस्तान हा एक आहे, आणि या देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी हिंदू आणि मुस्लिम दोघांनी एकत्र येणे आवश्यक आहे. 'अल् हिलाल' मधून ब्रिटिशांच्या अत्याचारांवर ते जोरदार टीका करत होते. ब्रिटिश शासन आझाद यांची टिकेमुळे संतप्त झाले. त्यांच्यावर दहा हजार रुपये दंड ठोठावला. त्यामुळे ते वृत्तपत्र बंद पडले. ब्रिटिशांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी 'अल् बलाग' नावाचे दुसरे वृत्तपत्र सुरू केले. त्यांनी मांडलेल्या विचारांमुळे मुसलमान समाजात जागरूकता निर्माण झाली. म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांना स्थानबद्ध केले. १९१५ ते १९१९ पर्यंत ते कारागृहात होते. पुढील काळात त्यांनी देशबंधू दास यांच्याबरोबर जोमाने कार्य केले. त्यामुळे दोघांना कारावासाची शिक्षा भोगावी लागली.

१९२३ साली दिल्ली येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष झाले. १९४२ च्या चलेजाव चळवळीत सहभागी झाले होते. त्यामुळे त्यांना पुन्हा शिक्षा झाली. १९३९ साली त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविले. त्यांनी फाळणीला कडाडून विरोध केला होता. तसेच फाळणीनंतर उसळलेला हिंसाचार शमविण्यात त्यांनी पुढाकार घेतला. स्वतंत्र भारताची राज्यघटना बनवण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. भारतीय मंत्रिमंडळात ते अकरा वर्षे शिक्षणमंत्री होते. या काळात भारतीय शिक्षण व्यवस्थेचा पाया रचण्याचे अभूतपूर्व कार्य आझाद यांनी केले. हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशी जाण्यासाठी सरकारी शिष्यवृत्ती देण्याची पद्धत देशात सुरू करण्याचे श्रेय त्यांना जातं. भारतीय संस्कृती आणि भारताची ओळख जगाला करून देण्यासाठी 'इंडियन सेंटर फॉर कल्चरल रिलेशन्स' ही संस्था मौलाना आझाद यांनी स्थापन केली. विशेष म्हणजे 'तर्जुमन-अल्-कुराण' या कुराणाच्या उर्दू अनुवादामुळे त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली. असा हा प्रभावी नेता २२ फेब्रुवारी १९५८ रोजी कालवश झाला. त्यांच्या कार्याला सादर प्रणाम!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

## निवडणूक कर्तव्य नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा

### जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांचा इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.१०** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठीची मतदान प्रक्रिया येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडणार आहे. ?निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून ही मतदान प्रक्रिया पार पाडण्याकामी विविध शासकीय, निमशासकीय आस्थापनांतील अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. परंतु अनेकजण निवडणुकीचे काम नाकारण्यात धन्यता मानीत असल्याचे तसेच कामात टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास येत आहे. निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य मानले जाते. पाच वर्षातून एकदा होणाऱ्या निवडणुकीतील या राष्ट्रीय कर्तव्यास नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांवर ? लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ नुसार शिस्तभंगाची कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी ? तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहेत.

मा.भारत निवडणूक आयोगामार्फत विधानसभा सार्वत्रिक निवडणूका २०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात दि.२० नोव्हेंबर रोजी २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे तसेच २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. ठाणे जिल्ह्यात एकूण ६ हजार ९५५ मतदान केंद्रे असून मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण ७ हजार ७१७ मतदान केंद्राध्यक्ष, ७ हजार ७१७ मतदान अधिकारी १५ हजार ४३४ इतर मतदान अधिकारी अशा एकूण ३० हजार ८६८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण देखील पूर्ण झालेले आहे. परंतु अनेक कर्मचारी त्यांना प्राप्त झालेले निवडणूक कर्तव्य आदेश रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच यासाठी अनेक जण विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या शिफारशी घेवून तसेच आजारपणाचा दाखला घेवूनही मोठ्या प्रमाणावर येत असल्याची बाब समोर आली आहे. ज्यांच्या आरोग्यविषयक अडचणी खऱ्या आहेत त्यांच्याबाबतीत प्रशासनाने सहकार्याची भूमिका घेतली आहे.

तथापि निवडणूक प्रक्रिया पार पडण्यासाठी मनुष्यबळाची नितांत आवश्यकता असून कर्मचाऱ्यांकडून अशा पध्दतीचे वर्तन अपेक्षित नसल्याचेही जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी नमूद केले आहे. ?निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून अशा प्रकारे जे कर्मचारी निवडणुकीसाठी त्यांना प्राप्त झालेले आदेश नाकारतील, निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहतील अथवा निवडणुकीच्या कामात हयगय करतील त्यांच्यावर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ नुसार थेट कारवाई करावी, असे निर्देश ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना जिल्हा निवडणूक कार्यालयामार्फत देण्यात आले आहेत.

## उल्हासनगर विधानसभा मतदार संघात ८५ वर्षावरील प्रौढ मतदारांसाठी गृहमतदानाला सुरुवात




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १४१ उल्हासनगर विधानसभा मतदार संघांतर्गत दिनांक ०९/११/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पवई चौक, उल्हासनगर येथे EVM व VVPAT मशीन्स Commissioning चे द्वितीय प्रशिक्षण पार पडले.

सदर प्रशिक्षणाच्या वेळी श्री. विजयानंद शर्मा, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तसेच श्रीम. कल्याणी कदम, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार व श्री. अमित बनसोडे, नायब तहसिलदार व सर्व संबधित अधिकारी कर्मचारी व शिपाई उपस्थित होते. तसेच मतदानाचा टक्का वाढावा व मतदानापासून कोणीही मतदार वंचित राहू नये यासाठी लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभा निवडणूकीसाठी ८५ वर्षावरील जेष्ठ मतदारांसाठी घरुनच मतदान करण्याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. गृहमतदानास दिनांक ०९/११/२०२४ रोजी दिव्यांग मतदार व ८५ वर्षावरील मतदारांचे गृहमतदान प्रक्रियेद्वारे मतदान करणेकरीता सुरुवात करण्यात आली. ०९ दिव्यांग मतदारांपैकी ०७ व ८५+ वर्षावरील २५ मतदारांपैकी २४ मतदारांनी असे एकूण ३४ मतदारांपैकी ३१ मतदारांनी मतदान केले. अशी माहिती सहा. निवडणूक निर्णय अधिकारी १४१ उल्हासनगर विधानसभा मतदार संघ यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

## भारत राजवानी (गंगोत्री ) - सामान्यांच्या मनातील लोकप्रतिनिधी



' असं म्हणतात की, तुम्हाला जर ,५० वर्षे जगायचं असेल तर भात पेरावा. तुम्हाला जर १०० वर्षे जगायचं असेल तर धरणं बांधावीत. आणि तुम्हाला जर १००० वर्षे जगायचे असेल तर माणसं जोडावी. ही किमया साधलीय भरत गंगोत्री यांनी .आपल्या राजकीय आणि सामाजिक स्वभावाने उल्हासनगर महानगरपालिकेत आपल्या प्रभागातून सतत तीन दा जनप्रतिनिधित्व करण्याची संधी, महापालिकेचे माजी सभागृह नेते पद भुषविणाचा यांनी हा भारत राजवानी (गंगोत्री ) यांच्या संवेदनशील कारकिर्दी मुळेच म्हणून च लोकनेता म्हणून लोकप्रिय ठरतात. स्वतः व्यवसायाने यशस्वी बिल्डर असलेल्या भरत गंगोत्री कडे शहराच्या विकासासाठी व्हिजन आहे..यांच्या द्वारे राज्य शासनाकडून भरघोस निधी व अलिकडेच २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन त्यांनी प्रभाग क्र.१६,१७,१८ मध्ये विकासाची गंगा प्रवाहित केली आहे भारत यांनी प्रभागात प्रशस्त रस्ते , समाज मंदिर, शौचालयं, भूमिगत गटारं, अद्यावत उद्यान उभारलीयेत. यामुळे जनता आणि भरत राजवानी यांच्यात अतूट ऋणानुबंध जुळलाय. कोणताही बडेजावपणा न करता सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या खांद्यावर हात ठेवून त्याच्या सुखदुःखात सतत सामील होणारा हा नेता युवा पिढीलाही हवाहवासाच वाटतोय.

कोविडच्या काळातही स्वतः चा जीव धोक्यात घालून त्यांनी आपल्या गंगोत्री वेल्फेअर फाऊंडेशनच्या माध्यमातून शेवटच्या माणसां पर्यंत अन्नधान्य, औषधोपचार पोहचवुन त्यांनी समाजाची काळजी घेतली. याचीच दखल घेऊन सकाळ समूहाने त्यांचा महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार , तहसीलदार, विविध सामाजिक संस्थानी त्यांचा गौरव केलाय.

२०१७ च्या निवडणुकीतही स्वतः च्या ताकदीवर पक्षाचे चार उमेदवार निवडून आणण्यामध्ये त्यांनी आखलेली रणनीती थक्क करणारी ठरली होती. पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी अपेक्षेपेक्षा अधिक सक्षम पूर्ण करण्यात भारत गांगोत्री माहीर असल्याने पक्षश्रेष्ठीही कायम त्यांच्यावर खुश असतात. विषय समजून घेणं, तो पत्रकार ,,शासन यांच्या समोर व्यवस्थित मांडणं आणि लोकहितवादी भुमिका स्पष्ट करणे यातून त्यांच्यातील सामाजिक जाणिवेच्या नेता नेहमीच समोर येतो .असा लोकप्रतिनिधी उल्हासनगर चा चेहरा बदलण्यासाठी नविन पर्याय म्हणून भरत गंगोत्री उभे राहिले आहेत

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी अ‍ॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# डोंबिवली मतदारसंघात वोटरस्लिप वाटपाला सुरुवात

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**कल्याण :** डोंबिवली विधानसभा मतदारसंघ अंतर्गत डोंबिवली शहर या भागात मतदार स्लिप वाटपाच्या उपक्रमाला सुरुवात झाली. डोंबिवली मध्ये एकूण २८५ मतदान केंद्रे असून तेवढे बीएलओ मतदान केंद्रनिहाय VIS slip वाटप करीत आहेत. डोंबिवली विधानसभा मतदार संघातंर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत मतदारांना VIS स्लीपचे वाटप करण्याचे काम सुरू झाले आहे. येत्या पंधरा तारखेपर्यंत सर्व मतदारांना स्लीप वाटपाचे काम पूर्ण करण्याचे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी अमित शेडगे यांनी सर्व बीएलओ यांना दिले. ज्या मतदारांना स्लिप मिळणार नाहीत त्यांनी आपल्या परिसरातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून मतदानाच्या स्लिप प्राप्त करून घ्यावे. सर्व क्षेत्रीय अधिकारी, प्रभागीय अधिकारी व तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी देखील या कामावर लक्ष ठेवून मतदारांच्या स्लिप वेळेत घरपोच होतील असे आदेश निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिले आहेत.

मतदान जनजागृती बाबत वेगवेगळ्या उपक्रम राबवण्यात येत असून सर्वांनी मतदानाचा अधिकार बजवावा असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी अमित शेडगे यांनी केले आहे.

# पेण मतदारसंघातील उमेदवारांनी निवडणूक खर्चासबंधित दस्तावेज सादर करावीत

## निवडणूक खर्च निरीक्षकांच्या सूचना

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**

**पेण :** विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये १९१-पेण विधानसभा मतदारसंघात एकूण ०७ अधिकृत उमेदवार असून अंतिम झालेल्या उमेदवारांनी खर्च नोंदवही, निवडणूक खर्चासाठी उघडलेली स्वतंत्र बँक खाते पासबुक, निवडणूक खर्चाची प्रमाणके व उपप्रमाणके, रोख रक्कम तपशील इत्यादी व निवडणूक खर्चाशी सबंधित इतर अनुषंगिक कागदपत्रे/दस्तावेज खालीदिलेल्या तारखांना मा.निवडणूक खर्च निरीक्षक यांच्यासमोर तपासणीकरिता सादर करावीत, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी प्रविण पवार यांनी केले आहे.

या खर्चाच्या नोंदवहीमध्ये नोंदविलेल्या लेख्यांची तपासणी, निवडणूक खर्चावर देखरेख सूचनांचा सारसंग्रह २०२४ मधील भाग-क (एक) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार प्रचार कालावधीत किमान तीन वेळा होणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.भारत निवडणूक आयोग यांच्याकडून नियुक्त करण्यात आलेले निवडणूक खर्च निरीक्षक, १९१-पेण विधानसभा रमेश कुमार हे उमेदवारांच्या खर्च नोंदवह्यांची तपासणी पुढील नमूद वेळापत्रकानुसार करणार आहेत. निवडणूक खर्च निरीक्षक, १९१-पेण विधानसभा यांच्यामार्फत उमेदवारांच्या खर्च नोंदवह्यांची तपासणी वेळापत्रक पुढीलप्रमाणे :- प्रथम, ९ नोव्हेंबर २०२४ वेळ सकाळी १०.००, द्वितीय, १३ नोव्हेंबर २०२४ वेळ सकाळी १०.००, तृतीय,१७ नोव्हेंबर २०२४ वेळ सकाळी १०.००, स्थळः- उपविभागीय अधिकारी कार्यालय, पेण, ता.पेण.

सदर तपासणीवेळी उमेदवाराने आपले खर्च रजिस्टर नोंदवही विहित पद्धतीने सादर न केल्यास त्यांच्यावर लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ व भारतीय दंडसंहितेच्या कलम १७७ अन्वये पुढील कार्यवाही प्रस्तावित केली जाईल याची नोंद घ्यावी.

## साठ लाख रुपये खर्चूनही रस्ता नाही...

# झोळी झाली शववाहिनी

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

### पेण तालुक्यातील आदिवासी महिलेच्या मृतदेहाची झोळीतून वाहतूक

**दै. ठाणे जीवनदिप वार्ता**

**पेण :** पेण तालुक्यातील चार-पाच किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या खवसावाडी येथील आंबी राग्या कडू या आदिवासी महिलेचे मृतदेह झोळीत टाकून नेण्याची वेळ आदिवासी बांधवांवर आली आहे. पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत बोरगाव नदीतील खौसावाडी आदिवासी वाडी येथे साठ लाख रुपये खर्चूनही प्रत्यक्षात रस्ताच नसल्यामुळे गुरुवार दिनांक ०७ नोव्हेंबर रोजी आंबि राघ्या कडू वय ४२ वर्ष ह्या आदिवासी मृत महिलेचा मृतदेह पेण ते खवसावाडी असे सुमारे पाच किलोमीटर झोळीत टाकून न्यावा लागल्याने आदिवासी समाजाला वालीच उरला नसल्याचे भयाण वास्तव समोर आले आहे.

दरम्यान ग्राम संवर्धन सामाजिक संस्था ही सामाजिक संस्था मागील दोन वर्षांपासून येथील खवसावाडी, काजुचीवाडी,केळीचीवाडी, तांबडी, आणि उंबरमाळवाडी ह्या पाचही आदिवासी वाड्यांच्या मूलभूत सुविधांसाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. मागील दोन वर्षांत रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासह संबंधित सर्व विभाग कार्यालांयावर मोर्चे आंदोलने काढून ह्या आदिवासींच्या वाट्याला आलेला विकास निधी रायगड जिल्हा परिषद पेण उपविभागाचे अभियंता आणि ठेकेदारांनी गीलंकृत केला असून याबाबतची माहितीच्या अधिकारात माहिती मागवली असतात तीही देण्यात आलेली नाही विशेष म्हणजे ह्याच आदिवासी वाड्यांच्या रस्त्यांसाठी ०१ जानेवारी २०२४ रोजी पुन्हा एकदा सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराला ७ कोटी ६० लाख रुपयांचा ठेका देण्यात आला आहे मात्र आज १० महिने उलटूनही ह्या रस्त्याचेही काम ठेकेदाराने सुरू केलेला नाही त्यामूळे येथील आदिवासीना मात्र रस्त्या अभावी वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यूला कवटाळावे लागते. अशा परिस्थितीत पेण पासून चार ते पाच किलोमीटर वर असलेल्या ह्या वाड्यांमध्ये लोकप्रतिनिधी एकदाही पोहोचले नसल्याचे येथील आदिवासी बांधवांचे म्हणणे असून याबाबत आदिवासी समाजामध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# निवडणूक प्रचारासाठी ठाण्यात ९४ रथांना परवानगी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यात आता उमेदवारांचा प्रचार सुरू झाला आहे. या प्रचारासाठी राजकीय पक्ष, अपक्ष आणि विविध संघटनांकडून रथांचा वापर केला जात असतो. या वाहनांची जाहीरात परवानगी अंतर्गत प्रादेशिक परिवहन विभागात नोंदणी केली जाते. त्यानुसार, ठाणे उपप्रादेशिक परिवहन विभागामध्ये तब्बल ९४ रथांना जाहीरात नोंदणी मिळाली आहे. या रथांमुळे प्रादेशिक परिवहन विभागाला देखील महसूल मिळाला आहे. विधानसभा निवडणूक प्रचाराला अवघे दोन आठवडे शिल्लक आहे. त्यामुळे विधानसभेचे उमेदवार आता प्रचारासाठी गल्लीबोळात देखील फिरताना दिसत आहे. प्रचारामध्ये जनतेपर्यंत पोहचण्यासाठी विविध वाहनांचा वापर होत असतो. या वाहनांवर राजकीय पक्ष किंवा अपक्षांचे निवडणूक चिन्ह असते. या वाहनांमध्ये फिरून उमेदवार आणि राजकीय नेते प्रचार करत असतात. अशा वाहनांची जाहीरात परवानगी अंतर्गत प्रादेशिक परिवहन विभागाच्या कार्यालयात नोंदणी केली जात असते. प्रादेशिक परिवहन विभागाच्या ठाणे उपविभागात म्हणजेच, ठाणे, भिवंडी आणि मिरा भाईंदर या शहरात अशा ९४ रथांची नोंदणी करण्यात आली आहे. राजकीय पक्ष, अपक्षांकडून या रथांचा वापर केला जात असतो. या परवान्यामुळे प्रादेशिक परिवहन विभागाला दीड लाखाहून अधिकचा महसूल मिळाला आहे. या नोंदणीत वाढ होऊ शकते अशी माहिती प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# महायुती उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्या 'रोड शो' ला तुफान प्रतिसाद



**दै.ठाणे जीवदीप वार्ता**

**कल्याण :** महायुतीचा प्रचार हा अत्यंत जोरामध्ये सुरू असून लाडक्या बहिणी या सर्व महायुतीसोबत उभ्या आहेत. त्यामुळे कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघासह महायुतीचे राज्यातील सर्व उमेदवार बहुमताने निवडून येणार असल्याचा विश्वास कल्याण लोकसभेचे खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी कल्याणात व्यक्त केला. कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील शिवसेना भाजप राष्ट्रवादी रिपाइं महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्या प्रचारासाठी निघालेल्या भव्य रोड शोमध्ये खा.डॉ. शिंदेही सहभागी झाले होते. त्यावेळी प्रसिध्दी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी हा विश्वास व्यक्त केला.

कल्याण पश्चिममधून विश्वनाथ भोईर यांच्या प्रचार फेरीला लोकांचा अत्यंत मोठा प्रतिसाद मिळत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आमदार विश्वनाथ भोईर यांच्या माध्यमातून मतदारसंघात चांगले काम झालेले आहे. तसेच मतदारसंघामध्ये मोठ्या प्रमाणात निधी आणून विविध योजना आणि विकासकामे करण्यात ते यशस्वी झाले असून विश्वनाथ भोईर हे पुन्हा एकदा मोठ्या मताधिक्याने निवडून येतील अशी खात्री खा. डॉ.श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केली. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यभरात जे विकासकाम केले आहे ते पाहता लोकच महायुतीची प्रत्येक जागा निवडून आणतील असेही खा. डॉ. शिंदे यांनी स्पष्ट केले.

तर विरोधकांना आता पराभव समोर दिसू लागला आहे, लाडक्या बहिणी बाहेर येऊन या निवडणुकीत महायुतीचा प्रत्येक उमेदवार निवडून आणणार आहे. याला घाबरून विरोधकांनी सुरुवातीला ज्या योजनेला सर्वाधिक विरोध केला, सत्तेत आल्यावर लाडकी बहीण योजना बंद करू असे सांगणारे आज आपल्या घोषणापत्रात ३ हजार रुपयांचे आश्वासन देत आहेत. हा किती मोठा विरोधाभास असल्याचे सांगत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला.

दरम्यान कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्या प्रचारासाठी आज अतिशय भव्य अशा रोड शोचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये महायुतीच्या सर्व घटक पक्षांचे प्रमुख नेते आणि सुमारे दोन हजारच्या आसपास बाईकस्वार कार्यकर्ते सहभागी झाले होते. प्रत्येक चौकाचौकात या प्रचार फेरीचे पुष्पवृष्टी आणि फटाक्यांच्या गजरात स्वागत करण्यात येत होते. दुर्गाडी चौकातून निघालेली ही रॅली आधारवाडी, खाडकपाडा, बिर्ला कॉलेज, भवानी चौक, सिंडीकेट, रामबाग ० नंबर, पुष्पराज हॉटेल, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून जुन्या कल्याणातील टिळक चौक, पारनाका मार्गे लालचौकी येथील आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके मैदानात संपन्न झाली. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, अरविंद मोरे, शहरप्रमुख रवी पाटील, भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार, विधानसभा संघटक छाया वाघमारे, आर पी आय जिल्हाध्यक्ष प्रल्हाद जाधव, विधानसभा संघटक मयूर पाटील, माजी नगरसेवक दुर्योधन पाटील, जयवंत भोईर, प्रभूनाथ भोईर, गणेश जाधव यांच्यासह महायुतीतील घटक पक्षाचे प्रमूख नेते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# डोंबिवली हे मिनी हिंदूराष्ट्र – सुनील देवधर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**☐ प्रतिनिधी**



### रविंद्र चव्हाण यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणा

**डोंबिवली :** राज्याच्या सांस्कृतिक नगरी म्हणजे आपल्या डोंबिवली शहरात आलो की, मिनी हिंदुराष्ट्रमध्ये आलो असल्याचा आनन्द होतो. त्यात हा जनसंघाचा बालेकिल्ला असून ती परंपरा, संस्कृती टिकवण्यासाठी आपल्या सगळयांना शंभर टक्के मतदान करण्याची गरज आहे. त्यासाठी आपण सगळयानी एकदिलाने काम करायला हवे. डोंबिवलीचा गड अभेद्य राहण्यासाठी मंत्री रविंद्र चव्हाण यांना पुन्हा एकदा प्रचंड मताधिकक्याने निवडून आणण्याची जबाबदारी आपल्या सगळ्यांची आहे, असे मत भाजपचे केंद्रीय माजी चिटणीस, ज्येष्ठ नेते सुनील देवधर यांनी व्यक्त केले.

डोंबिवलीत भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह संघ परिवाराच्या माध्यमातून १०० टक्के मतदान जनजागृतीसाठीच्या लोकमत परिष्कार उपक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी ते शहरात आले होते.

पश्चिमेला परिवाराच्या बैठकीनंतर त्यांनी रविंद्र चव्हाण यांच्या भाजप निवडणूक प्रचार कार्यालयात येऊन सगळ्यांशी सवांद साधला.

अत्यंत परखड विचार आणि स्पष्टवक्ता अशी त्यांची ख्याती असून त्यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी आदींना कानमंत्र दिले. काम कसे आणि काय करावे याबाबत सूचना दिल्या, कशा पद्धतीने जनसंपर्क करावा याबाबत चर्चा केली. पंतप्रधान मोदींवरील पुस्तकाचे भाजपसह उपस्थितांना वाटप केले.

त्यानंतर तीन सेवावस्ती, ब्राह्मण ज्ञाती बांधवांशी दिलखुलास बातचीत करून त्यांनी मतदानाची आवश्यकता स्पष्ट केली. पक्ष पातळीवर एकदा निर्णय झाला की त्यावर कोणतेही भाष्य न करता प्रचंड कामाला लागायचे असे त्यांनी सांगून दहा दिवस राहिले असून त्या दिवसांत कामाची पध्दत कशी असावी याबाबत मार्गदर्शन केले.

# मतदानाची टक्केवारी वाढावी हे उद्दीष्ट ठेवून सगळ्यांनी काम करावे – केंद्रीय निवडणूक निरीक्षक कुमार पुरुषोत्तम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मतदानाची टक्केवारी जास्तीत जास्त वाढावी हे उद्दीष्ट ठेवून सगळ्यांनी काम करावे, असे प्रतिपादन केंद्रीय निवडणूक निरीक्षक कुमार पुरुषोत्तम (भा.प्र.से.) यांनी केले. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढण्याच्या अनुषंगाने १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघ कार्यालयात आयोजित केलेल्या आढावा बैठकीत बोलताना केंद्रीय निवडणूक निरीक्षक कुमार पुरुषोत्तम यांनी हे प्रतिपादन केले. या बैठकीस कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, उपायुक्त प्रसाद बोरकर , कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील सहा.निवडणूक निर्णय अधिकारी राजू राठोड, संजय भोये, स्विप नोडल अधिकारी रुपाली




खोमणे तसेच कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघ परिक्षेत्रातील फ, ग, ई, जे व आय प्रभागांचे सहा.आयुक्त प्रतिनिधी उपस्थित होते. मतदानाची टक्केवारी वाढण्याच्या दृष्टीकोनातून मतदार माहिती चिठ्ठयांचे १०० % मतदारांना वाटप झालेच पाहिजे. त्याचप्रमाणे स्विप ?क्टीव्हीटी चांगल्या प्रकारे घेतल्या जातील याची खातरजमा करावी, ज्यामुळे मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती होईल, असेही निर्देश केंद्रीय निवडणूक निरीक्षक कुमार पुरुषोत्तम यांनी या बैठकीत दिले. मतदानापूर्वी ५ दिवस आधी म्हणजे दि. १५ नोव्हेंबर पर्यंत मतदार माहिती चिठ्ठया प्राप्त न झाल्यास, संबंधित मतदाराने कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघ कार्यालयातील नियंत्रण कक्षाचा टोल-फ्री क्रमांक १८००-२३३-१७५० तसेच दूरध्वनी क्रमांक ०२५१-२९७००१४ या दूरध्वनी क्रमाकांवर संपर्क साधावा, अशी माहिती कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी यावेळी दिली.

# आशियाई तायक्वांदो महासंघाचा पुमसे प्रशिक्षण प्रथमच पुण्यात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**☐ प्रतिनिधी**

**कल्याण :** आशियाई तायक्वांदो महासंघाचे पुमसे प्रशिक्षण कार्यक्रम प्रथमच भारतात आणि तोही महाराष्ट्रात आयोजित करण्यात आला आहे. पुणे शहरात होणाऱ्या या ऐतिहासिक कार्यक्रमासाठी आशियाई तायक्वांदो महासंघाचे तज्ञ प्रतिनिधी मंडळ दाखल झाले आहे. 'ताम'चे अध्यक्ष संदीप ओंबासे आणि महासचिव गफार पठाण यांनी प्रतिनिधी मंडळाचे जल्लोषात स्वागत करुन राज्याच्या तायक्वांदो इतिहासात ही ऐतिहासिक घटना असल्याचे त्यांनी सांगितले.

इंडिया तायक्वांदो आणि तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (ताम) यांच्या संयुक्त विद्यमाने पुमसे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आशियाई तायक्वांदो महासंघाचे अध्यक्ष क्यु सिओक ली आणि प्रतिनिधी मंडळाचे पुणे शहरात आगमन झाले आहे. तसेच आशियाई देशांतील दिग्गज मंडळी या कार्यक्रमात सहभागी होत आहेत. साहजिकच महाराष्ट्राच्या तायक्वांदो क्षेत्रासाठी ही मोठी घटना मानली जात आहे.

इंडिया तायक्वांदोचे कार्यकारी सदस्य विकास कुमार, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफार पठाण, खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी यांनी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. आशियाई तायक्वांदो महासंघाच्या प्रतिनिधी मंडळात अध्यक्ष क्यु सिओक ली, एटीयू सल्लागार समितीचे सदस्य चोंग क्वान ली, एटीयू व्यवस्थापक डोंग्युन किम, सहाय्यक व्यवस्थापक जोंग्युन कांग, मिंकी नो, मिन चिओल शिन, जेयूक जांग, सहाय्यक प्रशिक्षक बिहान शिन, यंगजिन जिऑन, दुभाषा ह्योजी आह, युंकेयोंग ह्वांग यांचा समावेश आहे.

या स्वागत सोहळयास स्थानिक तायक्वांदो पदाधिकारी व खेळाडू उपस्थित होते. त्यात प्रवीण शिरगावकर, तुषार अवटे, सपना यादव, प्रणव निवगुने, दिशा कदम, मनोज इंगळे, नितीन गुंडा, राकेश मांडोळे, निलेश भिल्लारे, अक्षय खेमतर, दत्ता कदम यांचा समावेश आहे. आशियाई तायक्वांदो महासंघाचा पुमसे शिक्षण कार्यक्रम इंडिया तायक्वांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला जात आहे. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट भारतात तायक्वांदो कौशल्ये आणि ज्ञान वाढवणे आहे. त्यामुळे ३० वर्षांखालील आणि त्यावरील तायक्वांदो खेळाडूंसाठी मान्यताप्राप्त आणि फ्रीस्टाईल पुमसे यांचा व्यापक अभ्यास होईल.

तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप ओंबासे म्हणाले की, 'आशियाई तायक्वांदो संघाच्या अध्यक्षांना आणि त्यांच्या प्रतिनिधी मंडळाला भारतात स्वागत करताना अत्यंत अभिमान वाटतो. या कार्यक्रमामुळे भारतीय तायक्वांदो खेळाडूंना जागतिक स्तरावरील अनुभव आणि ज्ञान मिळण्यास मदत होईल.'

'पुमसे प्रशिक्षण कार्यक्रम तायक्वांदो खेळाच्या वाढीसाठी महत्त्वाचा आहे. आशियाई तायक्वांदो महासंघाशी आपले संबंध अधिक दृढ होणार आहेत, जेणेकरून भारतातील खेळाडूंना अधिक संधी मिळतील असे संघटनेचे महासचिव गफार पठाण यांनी सांगितले. संघटनेचे खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी म्हणाले की, 'भारतातील तायक्वांदो खेळाडूंना प्रशिक्षकांसोबत ज्ञानाचे आदान प्रदान करण्याची संधी मिळणे ही मोठी गोष्ट आहे. या कार्यक्रमामुळे भविष्यातील खेळाडूंना प्रेरणा मिळेल.'

# नवनियुक्त प्राथमिक शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा वापर करुन शैक्षणिक गुणवत्ता वाढीस हातभार लावावा - शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : प्रतिनिधी**

नवनियुक्त शिक्षकांनी अद्ययावत ज्ञान, तंत्रज्ञान व कौशल्य आत्मसात करून ठाणे शहराची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहावे. याकरिता सदर प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त असून विविध विषयांचे मार्गदर्शन डायटच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात आलेले आहे, त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन ठाणे महापालिकचे शिक्षण अधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी नवनियुक्त शिक्षकांना केले.

तसेच या प्रशिक्षण केंद्रास ठाणे डायटचे प्राचार्य डॉ. संजय वाघ, ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाचे उपायुक्त सचिन सांगळे, जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनीही प्रशिक्षणार्थी मार्गदर्शन करून या प्रशिक्षणातून नवीन शैक्षणिक धोरण, बालक केंद्री शैक्षणिक धोरण, विद्यार्थी सुरक्षा, अध्ययन व अध्यापन तील बदलत्या प्रवाहांची ओळख होऊन नूतन शिक्षक सक्षमपणे ज्ञान दानाचे कार्य करतील असा आशावाद व्यक्त केला.

शासनाच्या अत्यंत पारदर्शक अशा 'पवित्र' पोर्टलच्या माध्यमातून भरती झालेल्या या नूतन शिक्षकांना शैक्षणिक क्षेत्रातील अध्ययन अध्यापन च्या बदलाबाबत मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता आहे. शिक्षक हे समाज व्यवस्थेचा कणा आहे. त्यांच्या माध्यमातून अनेक पिढ्या घडत असतात. त्या दृष्टीने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ठाणे व ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग यांचे संयुक्त विद्यमाने नवनियुक्त शिक्षकांचे प्रशिक्षण दि.०४ नोव्हेंबर ते दि.११ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत ठाणे महानगरपालिका शाळा क्र १८ येथे आयोजित करण्यात आले असून यामध्ये सुमारे १४८ शिक्षक येथे उपस्थित आहेत.

दिवाळी सुट्टीचा कालावधीमध्येही प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणात सक्रिय सहभाग घेतला. यामध्ये सुलभक मोकळीका, प्रात्यक्षिके, व पीपीटी सादरीकरणच्या माध्यमातून प्रशिक्षण देत आहेत. प्रशिक्षण समन्वयक व अधिव्याख्याता कुमार पाटील हे डायट च्या वतीने उपस्थित होते. या प्रशिक्षणाचे नियोजन मनपा गट अधिकारी श्रीमती संगीता बामणे यांनी केले. ठाणे मनपा च्या साधनव्यक्ती वृषाली सावंत या सहा.समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. या प्रशिक्षणासाठी संजय पाटील, वृषाली सावंत ., अर्चना वारघडे, ज्योती विशे, प्रविण कदम, चंचल वाघ, कांचन गायकवाड, सविता गोसावी व लता जामदार हे सुलभक म्हणून कामकाज करत आहेत.

तसेच महाराष्ट्र सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार जनजागृती कार्यक्रम (स्वीप) अंतर्गत मतदान विषयक जनजागृती करण्यासाठी प्रशिक्षणार्थींना शपथही यावेळी देण्यात आली. भारतीय लोकशाहीच्या या राष्ट्रीय उत्सवात सर्व शिक्षक पालक मतदार यांनी सक्रियपणे सहभाग घेऊन जबाबदारीने मतदानाचे कर्तव्य पार पाडावे असे आवाहन ठाणे महापालिकेचे शिक्षण उपायुक्त व स्वीप नोडल अधिकारी सचिन सांगळे यांनी यावेळी केले. शिक्षणाधिकारी व स्वीप नोडल अधिकारी कमलाकांत म्हेत्रे, स्वीप पथकातील मधील मीरा भाईंदर महानगरपालिकेचे सहा.आयुक्त यादव, ठाणे मनपाचे सहा.कार्यक्रम अधिकारी चेतन देवरे, गट प्रमुख परदेशी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# कोरावळे येथे दोन दिवसीय विठ्ठल रखुमाई उत्सव सोहळ्याचे आयोजन !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**☐ बाळासाहेब भालेराव**

मुरबाड दि.१० : मुरबाड तालुक्यातील कोरावळे येथे साल बाद प्रमाणे श्री पांडुरंगाच्या कृपाप्रसादाने वै.श्रीमान योगी बालकनाथ, गुरु रामनाथ , कमलनाथ महाराज धानिवली तसेच वैकुंठी बाबू गोल्हे यांच्या परम पुण्याने १२ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबर २०२४ रोजी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल रुखुमाई उत्सव सोहळा साजरा होत आहे. या भक्तिमय सोहळयात सामुदायिक काकडा भजन, सामुदायक हरिपाठ नेतृत्व तसेच कीर्तन सेवा इत्यादी प्रबोधनाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व पंचक्रोशीतील भक्त भाविक व नागरिकांनी दर्शन सुखाने पावन होऊन तीर्थप्रसाद लाभ घ्यावा अशी आवाहन ग्रामस्थ मंडळ कोरावळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
कौशल्य विकास केंद्र, गोवेली, म्हसा व खर्डी
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु ! प्रवेश सुरु ! प्रवेश सुरु !
१) बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं. ३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२) पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं. २०१२३०) — कालावधी १ वर्ष
३) जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट(GNMA) (कोड नं. २०१२३७) — कालावधी १ वर्ष
४) डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं. २०१४०४) — कालावधी २ वर्ष
५) सिक्युरिटी अँण्ड फायर प्रिव्हिंजन प्रशिक्षण (कोड नं. ४१११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
CALL: 8108559566 / 9158518832 / 9619188558
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

## महायुतीचेच सरकार....

पान १ वरून ▶▶ बनणार आहे, असे अमित शाह यांनी सांगितले. यावेळी त्यांनी काँग्रेसवर शेतकऱ्यांचे प्रश्न न सोडवल्याबाबत टीका केली, ते म्हणाले. काँग्रेस सरकार असताना शेतमालासाठी किमान आधारभूत किंमतीवर किती घेतला गेला. आता महायुती सरकार असताना किती घेतला गेला, त्याचा डाटा डाऊनलोड करुन पाहा. तसेच राज्यात सर्वाधिक जास्त दंगे आघाडीच्या सरकारमध्ये झाले आहेत. काँग्रेसच्या सरकारमध्ये झाले आहेत. संघावर बंदी आणण्याचे तीन वेळा प्रयत्न काँग्रेसने केले आहे. परंतु प्रत्येक वेळी संघ अधिक मजबूत होऊन पुढे आला आहे. आता तर काँग्रेसची सरकार येणार नाही? यामुळे हा प्रश्नच येत नाही. पूर्ण बहुमताने महायुतीचे सरकार येणार आहे, असे एका प्रश्नाच्या उत्तरात अमित शाह यांनी सांगितलं आहे.

**महायुतीचं सरकार आल्यानंतर मुख्यमंत्री कोण?**

महायुतीचे सरकार आल्यावर मुख्यमंत्री कोण होणार? या प्रश्नावर अमित शाह म्हणाले, सध्या महायुतीचे नेतृत्व एकनाथ शिंदे करत आहेत. निवडणूक त्यांच्या नेतृत्वाखाली लढवली जात आहे. निवडणुकीनंतर मुख्यमंत्री कोण होणार? हे तिन्ही पक्षाचे नेते एकत्र बसून निर्णय घेणार आहेत, असं अमित शाह यांनी म्हटलंय. महायुतीची सत्ता आल्यावर तीन पक्षांची कमिटी तयार होणार आहे. ती कमिटी तिन्ही पक्षाचा संकल्पपत्राचा अभ्यास करुन ती लागू करण्याबाबत निर्णय घेणार आहे. असं अमित शाह यांनी स्पष्ट केलं.

## मी म्हातारा झालो नाही...

पान १ वरून ▶▶ पटली नाही. या वयातही मी फिरतो असे तुम्ही म्हणालात, मी काय म्हातारा झालोय का? हे सरकार बदलल्याशिवाय मी म्हातारा होणार नाही. शांत बसणार नाही, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी करत निर्धारच व्यक्त केला. पुढे शरद पवार असेही म्हणाले, या लोकांच्या हातात सत्ता देऊन तुमच्या प्रश्नांची सोडवणूक या महाराष्ट्रात होतोय. हे बघितल्याशिवाय मी म्हातारा होणार नाही. आता एक म्हातारा खांद्यावर बसून आलेला पहिला का? असेही पवार म्हणाले. यावेळी खासदार ओमराजे निंबाळकर, रणजित पाटील उपस्थित होते. परांडा विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार राहुल मोटे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. तर राहुल मोटे यांच्या विरोधात शिवसेना शिंदे गटाचे तानाजी सावंत विधानसभा निवडणूक लढवत आहेत. या लढतीकडं संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलं आहे.

## प्रचारात आम्ही कुठे?...

पान १ वरून ▶▶ स्थानकांतील प्रवाशांशी चर्चा केली असता, लोकसभा निवडणुकीतच आमच्या प्रश्नांची चर्चा झाली नाही किमान विधानसभा निवडणुकीत तरी या प्रश्नांची ऊहापोह होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. मध्य रेल्वेच्या प्रवाशांमधील अनेक प्रवासी हे कल्याण, डोंबिवली, कर्जत, कसारा भागातून येतात. या प्रवाशांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असतो. सकाळ आणि सायंकाळच्यावेळी लोकल गाड्यांमध्ये चढता येत नाही, तोल जाऊन अपघात होणे अशा घटना दिवसागणिक वाढताना दिसत आहेत. याच बरोबर लोकल गाड्यांचा अनियमितपणा, तांत्रिक बिघाडामुळे रेल्वे गाड्या बंद होणे, भिक्षेकरी, गर्दुल्यांचा त्रास असे प्रकार सतत घडत असतात. रेल्वे स्थानकात होणारी गर्दी, चोरीच्या घटना अशा नानाविध समस्यांना रेल्वे प्रवासी सामोरे जात असतात. मात्र या समस्यांवर लोकसभा निवडणुकीच्यावेळीही बोलण्यात आले नव्हते. आणि विधानसभेच्यावेळी देखिल असेच काहीसे दृश्य दिसून येत आहे. त्यामुळे प्रचारात आम्ही आहोत कुठे असा सवाल आरोही यादव, रोहन कडव, प्रथमेश रोठे या प्रवाशांनी उपस्थित केला. कल्याण ग्रामीण, डोंबिवली या सारख्या विधानसभा क्षेत्रात मोडत असलेल्या कोपर, डोंबिवली या सारख्या स्थानकांमध्ये तेथील फलाटांचा प्रश्न, फाटकांवर होणारे अपघात, स्कायवॉकवरील फेरीवाले, रेल्वे स्थानक परिसारातील सोयी सुविधांच्या नियोजनाचा अभाव यामुळे प्रवासी त्रस्त आहेत. दिवा स्थानकात तर दररोज शेकडोंच्या संख्येने प्रवाशांची भर पडत आहे. या ठिकाणी उभ्या असलेल्या बेकायदा बांधकामांमधून स्वस्त घरे विकत आणि भाड्यानेही मिळतात. त्यामुळे दिवा उपनगराला गेल्या काही वर्षात एका लहान शहराचे स्वरूप प्राप्त झाले असून हा संपूर्ण भार रेल्वे स्थानक आणि आसपासच्या परिसरावर पडत आहे.

# पाडळी दर्या घाट वाहतुकीस धोकादायक
## खड्डयांच्या साम्राज्याने अपघाताचा धोका




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**पारनेर ☐ दिपक वरखडे**

पाडळी दर्या - घाटावरील पठार भागातील व घाटाखालील गावे जोडण्यासाठी पाडळी दर्या च्या घाटाचा दळण वळणाच्या दृष्टीने खूप वापर केला जातो , पण या घाटाच्या मध्यभागी गेल्या वर्षी झालेल्या पावसाने रस्त्याचा कठडा वाहून गेला व डांबरी रस्ता ही तुटल्याने वाहन चालकाच्या लक्षात न आल्यास मोठा अपघात होऊन मोठी जीवित हानी होऊ शकते , पण गंभीर बाबीकडे लक्ष द्यायला कोणालाही वेळ नाही .

देवीभोयरे फाटा ते पाडळी दर्या , पिंपरी पठार मार्गे पिंपळगाव रोठा फाट्या पर्यंत चा १२ किलो मीटरचा रस्ता म्हणजे खड्डयांचे साम्राज्यच . या रस्त्याने दुचाकी वा चार चाकी वाहने चालविणे, अतिशय जीवावर उदार होऊन प्रवास करणे होय . पठार वरील गावांना जाण्यासाठी व घाटांखालील गावांना येण्यासाठी पाडळी दर्या रस्ता व घाटाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो . साधारणतः २००२ साली दिवंगत आमदार वसंतराव झावरे पाटील यांनी आमदार निधीतून या १२ किलोमीटर च्या रस्त्याचे डांबरीकरण करून दिले होते . त्यानंतर च्या आमदारांनी फक्त एक वा दोन किलोमीटर पर्यंतचा रस्त्या चे डांबरीकरण केले , बाकी आहे तसाच . तदनंतर च्या राजकीय नेत्यांकडे ग्रामस्थांनी अनेक वेळा मागणी करून ही त्यांनी दुर्लक्ष केले , निवडणूका आल्या की , फक्त आश्वासनाचे गाजर दाखविले जाते , ग्रामस्थ ही त्याला भुलतात , पुन्हा पहिले पाढे पंचावन्न अशी स्थिती असते . रस्ता डांबरीकरण झाल्यानंतर अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी शेती कामांसाठी रस्ता खोदला , पण त्याची वेळीच डागडुजी न झाल्याने, त्यानंतर या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले . या मार्गावर खड्डयांचे प्रमाण जास्त असल्याने खड्डयात रस्ता की रस्त्यात खड्डा असा प्रश्न पडतो . शासन रस्त्यांच्या कामासाठी एकदाच निधी मंजूर करतात . पुन्हा दुरुस्तीसाठी फार मोठी प्रतिक्षा करावी लागते . या रस्त्याच्या दोन्ही बाजू ने पावसाचे पाणी जाण्यासाठी गटारी व छोटे पुल करणे आवश्यक आहे , पण त्या नसल्याने पावसाचे सरळ रस्त्यावर येते , परिणामी रस्ता या अतिरिक्त पाण्याने वाहून गेल्याने अजूनच रस्त्याची दुर्देशा झाली आहे .

# करण ठाकूर यांना जिल्हास्तरीय 'मावळी मंडळ श्री'चा किताब



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ शहर प्रतिनिधी**

**ठाणे :** श्री मावळी मंडळ ठाणे संस्थेने शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित ३५ वी जिल्हास्तरीय व अंतर्गत शरीरसौष्ठव 'श्री मावळी मंडळ श्री' स्पर्धा शनिवार दिनांक ०९ नोव्हेंबर २०२४ रोजी संस्थेच्या क्रीडांगणात मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेमध्ये अंतर्गत व जिल्हास्तरीय मिळून एकूण १४ व ४९ अशा ६३ स्पर्धकांनी भाग घेतला होता. ह्या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष सुधाकर मोरे यांनी केले. सदर स्पर्धेत अंतर्गत 'श्री मावळी मंडळ श्री' किताब किशोर सीताराम जाधव यांने तर जिल्हास्तरीय 'श्री मावळी मंडळ श्री' किताब ए बी एस स्टुडिओ जिम ठाणे या व्यायाम शाळेच्या करण श्रवण ठाकूर याने पटकविला.

अंतर्गत व जिल्हास्तरीय किताब विजेत्यांना प्रमुख पाहुणे कळवा पोलीस स्टेशन प्रमुख अशोक उतेकर, विशेष अतिथी अखिल भारतीय शरीरसौष्ठव संघटना अध्यक्ष कमलाकर पाटील, ठाणे जिल्हा शरीर सौष्ठव संघटना अध्यक्ष अमित नांदगावकर, न्यू इंडिया इन्शुरन्स ठाणे विभाग जिल्हा प्रमुख कौस्तुभ कुलकर्णी त्यांच्याबरोबर संस्थेचे अध्यक्ष सुधाकर मोरे, उपाध्यक्ष सुनील करंजकर, खजिनदार रिक्सन फर्नांडिस, चिटणीस रमण गोरे, उप चिटणीस संतोष सुर्वे, सह चिटणीस चिंतामणी पाटील, विश्वस्त कृष्णा डोंगरे, विश्वस्त प्रभाकर सुर्वे, विश्वस्त पॅट्रिक फर्नांडीस व विश्वस्त केशव मुकणे यांचे हस्ते देण्यात आला.

या स्पर्धेतील सांघिक विजेतेपद श्री मावळी मंडळ ठाणे (१४ गुण), तर सांघिक उपविजेतेपद ए बी एस स्टुडिओ जिम ठाणे (१२ गुण) यांना मिळाले. स्पर्धेमध्ये सहभागी व्यायामशाळेना शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेतील सर्वोत्तम शरीर सौष्ठव प्रदर्शक विजेता किताब ऑलीम्पिया जिम, कल्याणचा यश दीपक दळवी तर स्पर्धेतील सर्वोत्तम शरीर सौष्ठव प्रदर्शक उपविजेता किताब श्री मावळी मंडळ, ठाणे श्रेयश दिलिप खाडे यांना देण्यात आला.

# ठाणे जिल्ह्यातील ९ हजार विद्यार्थ्यांनी दिली टीईटी परीक्षा

### योग्य नियोजन व सीसीटीव्हीच्या माध्यमातून परीक्षा सुरळीत पार

### परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार टाळण्यासाठी सीसीटीव्ही व भरारी पथकाची नजर

**ठाणे : प्रतिनिधी**

विविध गैरप्रकारांमुळे चर्चेत असलेली शिक्षक पात्रता परीक्षा (ऊॅं) राज्यात तीन वर्षांनंतर दि.१० नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्यात आली. ठाणे जिल्ह्यात या परीक्षेसाठी १० हजार १७८ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५ केंद्रांवर ९२४० परिक्षार्थीनी परीक्षा दिली. तर ९३८ उमेदवार परीक्षा दिली नाही. ही परीक्षा सुरळीत व अधिकाधिक पारदर्शक करण्याच्या दृष्टिनेही जिल्हा प्रशासन व शिक्षण विभागाने नियोजन करून विविध उपाययोजना करण्यात केल्या. परीक्षेत गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्ही आणि बायोमेट्रिक सह भरारी पथकाचा आधार घेत परीक्षार्थींची कोणताही प्रकारची गैरसोय न होऊ देता जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद ठाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे काटेकोर मार्गदर्शनाखाली परीक्षा सुरळीत पार पडली. अशी माहिती शिक्षणाधिकारी (प्राथ.) बाळासाहेब राक्षे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद, पुणे अंतर्गत शिक्षक पात्रता परीक्षेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व मुख्य कायंकारी अधिकारी रोहन घुगे, यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद ठाणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहितुले यांनी झोनल अधिकारी, सहाय्यक परीरक्षक व केंद्र संचालक यांचे मार्फत प्रत्यक्ष केंद्र भेटी व जिल्हा परिषद, ठाणे येथून केंद्रावरील सीसीटिव्ही कॅमेऱ्याचे माध्यमातून संबंधितांच्या समस्या समजावून घेऊन वेळेत परिक्षार्थींना गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली.

शिक्षक बनण्यासाठी २०१३ पासून टीईटी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यासाठी प्राथमिक स्तरावर (पेपर-१) व माध्यमिक स्तरावर (पेपर-२) परीक्षा घेतली जात आहे.

ठाणे जिल्ह्यात २८ परीक्षा केंद्रांवर ९२४० परीक्षार्थींनी ही परीक्षा दिली. यापैकी सकाळच्या सत्रासाठी १०. ३० ते १ या वेळेत ४ हजार ३५४ परीक्षार्थींनी तर दुपारच्या सत्रासाठी २.३० ते ५ या वेळीत ४ हजार ८८६ परीक्षार्थींनी परीक्षा दिली. परीक्षेत गैरप्रकार टाळण्यासाठी दोन भरारी पथके व परीक्षा परिषदेकडून खासगी एजन्सीद्वारे परीक्षा केंद्रावर ६५ विद्यार्थ्यांसाठी एक बायोमेट्रिक यंत्राची व्यवस्था करून परीक्षार्थींची तपासणी करण्यात आली.

शिक्षक पात्रता परीक्षा (TET) सुरळीत व अधिकाधिक पारदर्शक करण्याच्या दृष्टिनेही जिल्हा प्रशासन व शिक्षण विभागाने विविध उपाययोजना व योग्य नियोजन करून परीक्षेत गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्ही आणि बायोमेट्रिक सह भरारी पथकाचा आधार घेत परीक्षार्थींना कोणताही प्रकारची गैरसोय होऊ न देता जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद ठाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे काटेकोर मार्गदर्शनाखाली परीक्षा सुरळीत पार पडली. यावेळी झोनल अधिकारी, सहाय्यक परीरक्षक व केंद्र संचालक व सर्व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद , ठाणे

# मुरबाड विधानसभा मतदारसंघातील संपर्क अभियानास मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ तालुका प्रतिनिधी**

**मुरबाड :** मुरबाड विधानसभा मतदारसंघातील भाजपा सेना युतीचे उमेदवार किसन कथोरे.यांच्या प्रचार दौरा संपूर्ण मतदारसंघात सुरु असून कल्याण तालुक्यातील ५५ गावात थेट मतदाराशी संपर्क करत आहेत. या मतदार भेटीसाठी भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट व मित्र पक्ष युतीचे कार्यकर्ते सहभागी होत आहेत. महायुतीचे उमेदवार किसन कथोरे यांना मतदारांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभत आहे. महायुतीचे सर्व पदाधिकारी प्रचारात उतरले आहेत. बुधवार पासून सूरू झालेला हा प्रचार दौरा धुमधडाक्यात मतद्रांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे चांगलाच चर्चेत आलेला आहे. मुरबाड तालुक्यातील सर्वच गावात किसन कथोरे यांना भरघोस प्रतिसाद मिळत आहे. तीच स्थिती बदलापूर सह अंबरनाथ च्या ग्रामीण भागात आहे.

# कल्याण ग्रामीणच्या मनसे पदाधिकाऱ्यांचा महायुती उमेदवार राजेश मोरे यांना पाठिंबा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण ग्रामीण विधानसभेची निवडणूक लढवत असलेल्या शिवसेना भाजपा राष्ट्रवादी आरपीआय महायुतीचे उमेदवार राजेश मोरे यांना विविध समाज संस्थांकडून पाठिंबा मिळत आहे. आज रविवारी कल्याण ग्रामीण मधील मनसे पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने राजेश मोरे यांना पाठिंबा जाहीर केला. खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत मनसेच्या पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेला पाठिंबा जाहीर केला. शिवसेनेचा झेंडा हातात घेत राजेश मोरे यांच्यासाठी एकदिलाने काम करणार असल्याचे आश्वासन दिले.

कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून शिवसेना भाजपा राष्ट्रवादी आरपीआय महायुतीचे उमेदवार राजेश मोरे यांच्या प्रचाराचा झंजावत मागील काही दिवसापासून वाढला आहे. खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे दोन दिवसांपासून मोरे यांच्या प्रचारात सक्रिय सहभागी झाले आहेत. यामुळे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांना हुरूप आला

### खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत पाठिंबा जाहीर

असून विविध पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते सामान्य नागरिक विविध संघटना संस्था शिवसेनेला पाठिंबा देत आहेत.

आज कल्याण ग्रामीण मधील मनसेचे कल्याण लोकसभा मनसे विद्यार्थी सेनेचे जिल्हा सचिव प्रितेश पाटील, मनसे विद्यार्थी सेनेचे आजदे शाखाअध्यक्ष दीप सोनावणे, दिवा मनसेचे शाखाध्यक्ष अनिकेत चंदनशिव, डॉक्टर नीयती देवळेकर, शुभम शिंदे, अभिषेक जोशी, संदेश घोडविंदे, गौरव आजार्लेकर, मनसे आजदे महिला सेना शाखाध्यक्ष सुशिला शेलार, लता पाटील, उपशाखा अध्यक्ष आजदे महिला सेना विजया जाधव, साहिल लाहोरी, साहिल छजलानी, श्रेयस जाधव, पवन कसबे, अभिषेक चोरगे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत राजेश मोरे यांना पाठिंबा देत शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला.

यावेळी बोलताना प्रितेश पाटील यांनी खासदार श्रीकांत शिंदे हे तरुणासाठी पुढाकार घेऊन काम करत आहेत त्याला प्रेरित होऊन शिवसेना पक्षात प्रवेश केला असून यापुढे पक्षाचे नेते ज्याप्रमाणे आदेश देतील त्या आदेशाचे पालन करत काम करणार असून विधानसभेचे शिवसेनेचे उमेदवार राजेश मोरे यांच्या प्रचाराचे काम करत त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

# निवडणूक कर्तव्यात कसूर !
## उल्हासनगर भरारी पथकातील कर्मचाऱ्यांचे निलंबन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे ☐ प्रतिनिधी**

**उल्हासनगर : दि.१० नोव्हें. :** उल्हासनगर विधानसभा मतदार संघातील भरारी पथक क्र.३ व ६ मधील कर्मचारी श्री. संकेत चनपुर, लिपीक, उल्हासनगर मनपा, श्री. संदिप शिरसवाल, लिपीक, उल्हासनगर मनपा व श्री आण्णासाहेब बोरूडे, मुकादम, उल्हासनगर मनपा व या पथकामधील पोलीस कर्मचारी श्री. विश्वनाथ ठाकूर, पो.हवा आणि श्री. राजरत्न बुकटे, पो.ना यांचेवर कर्तव्यात कसूर केल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांचेद्वारे दि.०८/११/२०२४ रोजी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची घटना दिनांक १८/१०/२०२४ रोजी घडल्यानंतर संबंधित व्यक्तिने पोलीस उप-आयुक्त यांच्याकडे दिनांक १९/१०/२०२४ रोजी तक्रार दाखल केली होती. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-४ यांनी याबाबत तपास करून व संबंधितांचे जाब-जबाब घेऊन दिनांक २८/१०/२०२४ रोजी आयुक्त, उल्हासनगर मनपा व निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्रथम अहवाल सादर केला होता. संबंधित कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर करून भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला असल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी तात्काळ दिनांक ३१/१०/२०२४ रोजी संबंधित कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करणेसाठी संबंधित विभागांना अहवाल पाठविला होता. भविष्यात पुन्हा असा प्रकार होऊ नये यासाठी प्रशासकीय कारवाई सोबतच संबंधित कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची कठोर कारवाई निवडणूक निर्णय अधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.

श्री. बबन आमले, रा.भांडूप (पश्चिम) हे दिनांक १८/१०/२०२४ रोजी पहाटे वा. सुमारास म्हारळ नाका, उल्हासनगर नं.१ या ठिकाणाहून त्यांचे मित्र नितीन शिंदे यांचेसह त्यांचे इटिंगा कार मधून अहमदनगर व पुणे जिल्हयातील फुल उत्पादक शेतकरी यांचे फुल विक्री करून त्यांचे मालाचे पैसे त्यांना घरपोच देण्यासाठी रोख स्वरूपात रक्कम रू.७,५०,०००/-घेऊन जात असताना भरारी पथकाचे प्रमुख श्री. संदिप शिरसवाल व श्री. संकेत चनपुर यांनी मिळून आलेल्या पैशाबाबत 'तुमच्यावर गुन्हा दाखल होईल. पैस जप्त करून ते परत मिळणार नाही' अशी भिती घालून सदर रक्कमेपैकी रक्कम रू.८५,०००/- काढून घेतले होते. याबाबत पोलीस विभागाने तपास करून त्यांचा अहवाल निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर केला होता. संबंधितांवर प्रशासकीय कारवाई सुरू असताना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना दिनांक ०८/११/२०२४ रोजी सदरची बाब समजल्यानंतर त्यांचेमार्फत तात्काळ गुन्हा दाखल करणेचे निर्देश देणेत आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी श्री. शर्मा यांनी संबंधित दोषी कर्मचा-यांवर दिनांक ०८/११/२०२४ रोजी रात्री गुन्हा दाखल केला आहे. तसेच, निवडणुक निर्णय अधिकारी यांनी सदर कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय शिस्तभंग विषयक कारवाई होणेकामी पाठविलेल्या अहवालाच्या आधारे आयुक्त, उल्हासनगर, मनपा व पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-४ यांनी संबंधित पाच ही कर्मचाऱ्यांना निलंबित करणेत आलेले आहे. भरारी पथक क्र. ३ व ६ मध्ये नविन कर्मचारी यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. सर्व पथकांनी त्यांचे निवडणूकीचे काम योग्यरित्या व निःपक्षपाती करणेबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कडक निर्देश दिलेले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या या कठोर कारवाईमुळे मतदारसंघातील सर्वच पथक सतर्क झाले आहेत.

# कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षावरील २८ तर ५ दिव्यांग मतदारांचे गृहमतदान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** मतदानाचा टक्का वाढावा व मतदानापासून कोणीही मतदार वंचित राहू नये यासाठी लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभा निवडणुकीसाठीही ८५ वर्षा वरील ज्येष्ठ मतदारांसाठी व दिव्यांग मतदारांसाठी घरूनच मतदान करण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षावरील २८ ज्येष्ठ मतदारांनी व ५ दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असल्याची माहिती कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी दिली. उर्वरित एक ज्येष्ठ मतदार गंभीर आजारी असल्यामुळे मतदान करू शकले नाहीत. ४० टक्के अंपगत्व व ८५ वर्षांवरील वृद्ध यांच्याकरिता भारत निवडणूक आयोगामार्फत १२ D नमुना भरून घरूनच मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ज्या इच्छुक मतदारांनी विधानसभा निवडणुक २०२४ ची अधिसूचना जाहीर झाल्यानंतर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे १२ D फॉर्म भरून दिले होते त्यापैकी पात्र मतदारांनी आज टपाली मतदान करून आपला अधिकार बजावला.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी